महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८१ वे | दिनांक : २६/०६/२०२६ | वार : शुक्रवार

## शहीद जवानांच्या कुटुंबीयांना जमिनीवरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ, मंत्री बावनकुळे



**मुंबई :** राज्यातील वीर जवान आणि अधिकारी शहीद झाल्यानंतर त्यांच्या वीर माता, वीर पत्नी किंवा अधिकृत वारसांना उदरनिर्वाहासाठी शासनाकडून शेतीसाठी जमीन दिली जाते. मात्र, ही जमीन त्यांच्या नावावर करताना मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हे मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान भवन परिसरात माध्यमांशी संवाद साधताना दिली.

माध्यमांशी बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, "शहीद कुटुंबांना दिलासा देण्यासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने हा मोठा निर्णय घेतला असून, आता महसूल खात्याची जमीन वीर माता किंवा पत्नीच्या नावे करताना कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही."

मंत्रिमंडळ बैठकीतील इतर निर्णयांची माहिती देताना बावनकुळे यांनी सांगितले की, प्रसिद्ध पर्यटन स्थळ माथेरान येथे पर्यटकांसाठी पार्किंगची मोठी समस्या होती. यासाठी माथेरान नगरपालिकेच्या मागणीनुसार महसूल विभागाची 5 एकर जागा पार्किंगसाठी मंजूर करण्यात आली आहे. याशिवाय, नागपूर जिल्ह्यातील 'गादा' येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासासाठी 4 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या नावाशी जोडल्या गेलेल्या आदिवासी जमीन प्रकरणावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, जिल्हाधिकाऱ्यांकडून 3 प्राथमिक अहवाल प्राप्त झाले आहेत. यात नियमांनुसार झालेली प्रक्रिया, सुनावणीची संधी आणि तांत्रिक त्रुटी तपासल्या जात असून सरकार यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

शिवसेनेतील अंतर्गत घडामोडींवरून उद्धव ठाकरे यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, 'ऑपरेशन टायगर'शी भारतीय जनता पार्टीचा काहीही संबंध नाही. आपला पक्ष कसा चालवायचा किंवा वाढवायचा हा उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचा अंतर्गत प्रश्न आहे.

## 'खासदार झाले, आता पुढचा नंबर आमदारांचा' : भाजप नेते नारायण राणे



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आणि ठाकरे गटाला पुन्हा एकदा बंडखोरीला सामोरे जावे लागले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी सावध भूमिका घेत आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला देखील काही आमदारांची अनुपस्थिती होती. यावरून पुन्हा उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या असून आता यात भाजप नेते नारायण राणे यांनी मोठे विधान करत म्हटले, खासदार गेले आता आमदारही फुटू शकतात.

नारायण राणे म्हणाले, ऑपरेशन झाले ना, सहा खासदार इकडून तिकडे गेले. आमचा हेतू साध्या झाला, कुठून काय कोणी केले कशाला काढता? हे सर्व लोकशाहीसाठी धोकादायक आहे की नाही हे परिस्थितीनुसार कळेल. सर्व टायगर भाजपमध्ये आले. ठाकरेंकडे आमदार आहेत कुठे? सध्या तरी त्यांच्याकडे तीनच खासदार आहेत, ते काही उद्धव ठाकरेंना सोडणार नाहीत. त्यांना आम्ही भाजपमध्ये घेणार नाही. आम्ही माणूस बघून घेतो.

पुढे बोलताना नारायण राणे म्हणाले, पुढचा नंबर आमदारांचा लागेल. खासदारांना जो काही मोबदला मिळाला, आता आमदार म्हणणार आम्हाला मिळू दे राजकीय वर्चस्व. उद्धव ठाकरेंना सध्या बरे नाहीये. जाऊ दे ना त्यांना सोडा. तीन खासदारांना त्यांना घेऊन बसू द्या. बाळासाहेबांची मला आठवण येते, उद्धवची नाही. वाईट वाटते जो पक्ष मी सुरुवातीपासून पाहिला, त्याचा आज अस्त होताना मला बरे वाटत नाही.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटातील ६ खासदारांनी बंडखोरी करत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत केला आहे. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, शिर्डीचे भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील, संजय जाधव, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. आता नारायण राणे यांनी आमदार फुटणार असल्याचे विधान केल्याने आगामी काळात उद्धव ठाकरेंना पुन्हा एकदा मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाल्याचे नाकारता येत नाही.

## "मी पत्रकारांसोबत" : गुणरत्न सदावर्तेंनी बोंब मारत केला निषेध



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटातील फुटीर खासदार आणि सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना शिंदे गटात प्रवेश केलेले संजय दिना पाटील यांनी आज पत्रकारांशी बोलताना अर्वाच्य भाषेचा वापर केल्याने खळबळ उडाली आहे. त्यांच्या या वादग्रस्त विधानाचे पडसाद अधिवेशनातही उमटलेले दिसले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी देखील तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी देखील आक्रमक भूमिका घेतली आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, संजय दिना पाटील यांच्या प्रकरणात मी पत्रकारांसोबत आहे. पत्रकारांनी निसंकोचपणे समोर यावे. मी त्यांच्यासोबत जाईल. जितेंद्र आव्हाड योग्य बोलले. संजय दिना पाटील यांना काहीच माहीत नाही. संजय दिना पाटील यांना रेडीमेड मिळालेले आहे. त्यांना संघर्ष माहीत नाही. त्यांना लोकशाही माहीत नाही, अशी टीका सदावर्ते यांनी केली आहे.

पुढे बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, मी या मटेरियलला ओळखत नाही. असे मटेरियल महाराष्ट्रात चालत नाही. सामान्य मराठी भाषेत संजय दिना पाटील यांचे असे बोलणे म्हणजे माजलेपणाचे लक्षण आहे. अशा घटनेचा सगळ्यांनी सगळ्या राजकीय पक्षांनी निषेध करायला हवा. माझा कधी संजय दिना पाटील यांच्याशी संबंध आलेला नाही. पण हा प्रकार निंदनीय आणि निषेधार्ह आहे. असे वैचारिक महाराष्ट्रात चालत नाही, महाराष्ट्र हे खपवून घेत नाही. संजय पाटील हे लोकप्रतिनिधी आहेत, ते लोकांचे सेवक आहेत. देशात संविधान लागू झालं तेव्हापासून देशातली सगळी दादागिरी, पाटीलकी संपली. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पोलिसांनी या प्रकरणात थेट गुन्हा दाकल करावा. राजकारण्यांची चिंता करू नये. असेच चालू राहिले तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे नाव शिंदे टोळी असे पडेल, असा टोलाही गुणरत्न सदावर्ते यांनी लगावला आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, पाच खून कोणाचे केले ते संजय दिना पाटील यांना सांगावे लागेल. पोलिसांनी त्याचा तपास करावा. आज एकनाथ शिंदेंनी संजय दिना पाटील यांना बोलावून घेऊन पत्रकारांसमोर उभे करायला हवे होते. मुख्यमंत्र्यांनी क्रिमिनल कायद्यानुसार कारवाई करावी. तसेच पत्रकाराच्या केसाला धक्का लागला तर कायदेशीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही सदावर्ते यांनी दिला आहे. तसेच शेवटी, संजय दिना पाटील यांचा बोंब मारून मी निषेध व्यक्त करतो. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करावा आणि मी संजय दिना पाटील विरोधात गुन्हा दाखल करायला तयार आहे. मी पत्रकारांसोबत आहे, असेही सदावर्ते यांनी म्हटले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ जून २०२६


## भित्री मनीमाऊ

लपून छपून
येते मनीमाऊ
चोरून खाते
बाळाचा खाऊ

पातेल्यातील दुध
करते फस्त
पांढरी मिशी
दिसते मस्त

खिडकीतून जाते
अंग चोरुन
उंदराला आणते
तोंडात धरून

मऊ मऊ शरीर
राखाडी रंग
जिभेने चाटून
स्वच्छ करते अंग

कुत्र्याला पाहून
बोबडी वळते
शेपूट हलवित
दूर दूर पळते




- **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९९०६


## बळीराजाचे हाल

कृषीप्रधान भारतात बळीराजा बेहाल आहे.
पिकलेला माल बाजारी कवडीमोल जात आहे.

शेती मालास हमीभाव कधी मिळणार ?
बांधा-बांधावर पाणी कोण आणणार आहे ?

बळीराजाच्या मालावर दलालांचे पोट भरते..
राबणाऱ्या बापाचे छळ कधी थांबणार आहे.

बळीराजा म्हणून भर दिवसा करतात सारे लुट.
सरसकट कर्जमाफी कधी कोण करणार आहे.

सारेच भाव वाढवून, दलाल डाव साधतात.
भोळ्या बळीराजाचे भर दिवसा लूट होत आहे.

बळीराजाचे पुत्र होऊन सारेच कसे थंडावले.
कृषीप्रधान देशामध्ये राबणारा बेहाल आहे.

महागाई वाढताच वस्तूंचे सर्व भाव वाढतात.
शेती मालाचे भाव जाणून बुजून पाडत आहे ?




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## हिंगोली जिल्हा पोलिस अधीक्षक पदी डॉ. श्रेणिक लोढा; डॉ. निलाभ रोहन यांची नांदेडला बदली





**हिंगोली (गोपाल सातपुते) :** राज्य पोलीस दलातील वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांचे सत्र सुरुच असुन,गृह विभागाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार हिंगोली जिल्ह्याला नविन पोलीस प्रमुख मिळाले आहेत. कर्तव्यदक्ष आणि धडाकेबाज आयपिएस अधिकारी डॉ. श्रेणिक लोढा यांची हिंगोलीचे जिल्हा पोलिस अधीक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.तर हिंगोलीचे मावळते पोलिस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांची नांदेड येथे बदली करण्यात आली आहे.खामगाव ते हिंगोली: - डॉ. श्रेणिक लोढा यांच्याकडे मोठी जबाबदारी...२०१८ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले डॉ. श्रेणिक लोढा हे मुळचे बीड जिल्ह्यातले रहीवाशी आहेत. व्यावसायीक शिक्षणाने डॉक्टर असलेल्या लोढा यांनी वैद्यकीय सेवेचा त्याग करुन देश सेवेसाठी पोलीस दल निवडले.यापुर्वी त्यांनी अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे उप विभागीय पोलीस अधिकारी,तसेच नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हा आणि बुलढाण्यातील खामगाव येथे अतिरीक्त पोलीस अधीक्षक म्हणुन अंत्यत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांचे परिसहायक (ADC) म्हणुन ही त्यांनी राजभवनात सेवा दिली आहे. खामगाव येथे कार्यरत असताना त्यांनी अवैध धंदे, गुटखा माफीया आणि वाळु तस्कर यांचे कंबरडे मोडले होते. त्यांच्या याच धडाकेबाज कार्यपध्दतीचा विचार करता शासनाने त्यांच्याकडे हिंगोली जिल्ह्याची पुर्ण कमान सोपवली आहे. मावळते जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या कार्याचा आलेखहिंगोलीचे मावळते पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी आपल्या कार्यकाळात हिंगोली जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यात मोलाची भुमिका बजावली.पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवणे, सायबर गुन्हेगारीला आळा घालणे आणि जनतेशी थेट संवाद साधुन पोलीसांबद्दल विश्वास वाढवण्यात त्यांनी मोठे यश मिळविले होते. आता त्यांची बदली नांदेड येथे झाली असुन, तिथे ही त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा पोलीसांना मोठा फायदा होईल अशी आशा व्यक्त होत आहे.गुन्हेगारांवर वचक निर्माण होणार;जनतेत उत्सुकता... डॉ. श्रेणिक लोढा हे गुन्हेगारी विरुध्द 'झिरो टॉलरन्स' धोरणासाठी ओळखले जातात,अनेक संवेदनशील कारवायांमध्ये ते स्वत: उतरुन छापे टाकतात त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात पाऊल ठेवताच ते अवैध दारु, जुगार, गुटखा माफीया विरोधात कोणती मोठी मोहीम उघडतात, याकडे संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. महिला सुरक्षा आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रात ही त्यांच्याकडुन विशेष पावले उचलली जातील,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नवे पोलीस अधीक्षक डॉ. श्रेणिक लोढा हे लवकरच हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्विकारणार असुन, त्यांच्या या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तींना चाप बसेल,असा सुर नागरीकांमधुन उमटत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ जून २०२६


## राष्ट्रहित हरवलेली सत्तेची स्पर्धा

**मि**त्रांनो, मला तरी तशा अर्थाने राजकारणाशी संबंध नाही. विचार बदलनारे लोक रोज नवी पांयंडे पाडतात त्याची खरच कीव करावीशी वाटते. केळस हा शब्द वापरने तसे योग्य नाही.अशा स्थितीमध्ये तिसऱ्या डोळ्यांनी, तिसऱ्या नजरेने राष्ट्रहित म्हणून पाहणाऱ्या अनेक व्यक्तींच्या समोर थोडासा विचार लिहावा वाटला म्हणून दोन शब्द लिहितो आहे. लोकशाही ही जनतेच्या विश्वासावर उभी असते. राजकारण हे समाजसेवेचे, राष्ट्रनिर्मितीचे आणि जनकल्याणाचे प्रभावी माध्यम मानले जाते. परंतु आजच्या काळात राजकारणाचा मूळ हेतू हरवत चालला आहे. विचार, तत्त्वे, निष्ठा आणि मूल्ये यांची जागा सत्तेच्या हव्यासाने घेतली आहे. म्हणूनच आजच्या राजकारणाला सवंग राजकारण असे म्हणावे लागते.पूर्वी राजकारणात विचारधारा महत्त्वाची होती. नेते एखाद्या पक्षाशी, तत्त्वाशी आणि जनतेच्या हिताशी बांधील असत. राष्ट्रहितासाठी त्यांनी तुरुंगवास भोगला, संघर्ष केला आणि त्याग केला. आज मात्र परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसते. सत्तेची चाहूल लागली की झेंडे बदलले जातात, विचार बदलले जातात आणि कालपर्यंत ज्यांचा विरोध केला त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसण्यास अनेकजण तयार होतात.आज अनेक राजकीय नेत्यांसाठी पक्ष हा केवळ सत्तेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग बनला आहे. सत्तेच्या खुर्चीसाठी कोणत्याही तडजोडी करण्याची तयारी दिसते. निवडणुकीपूर्वी एक विचार आणि निवडणुकीनंतर दुसरा विचार हे आता सामान्य झाले आहे. जनतेसमोर दिलेली आश्वासने विसरली जातात आणि सत्तेची गणिते मांडण्यातच संपूर्ण वेळ खर्च होतो.या सवंग राजकारणाची सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे राष्ट्रहिताचा अभाव. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, जलसंधारण यांसारख्या मूलभूत विषयांवर गंभीर चर्चा कमी होत आहे. त्याऐवजी आरोप-प्रत्यारोप, द्वेषाचे राजकारण, जाती-पातीचे समीकरण आणि सत्तेसाठी होणाऱ्या राजकीय खेळी यांनाच महत्त्व प्राप्त होत आहे.देशाच्या विकासासाठी दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता असते. परंतु सवंग राजकारणात पुढील निवडणूक जिंकणे हाच एकमेव उद्देश उरतो. त्यामुळे समाजातील अनेक गंभीर प्रश्न कायम राहतात. जनतेचा लोकशाहीवरील विश्वास कमी होऊ लागतो आणि राजकारणाबद्दल उदासीनता निर्माण होते.आज गरज आहे ती राजकारणाला पुन्हा मूल्यांची जोड देण्याची. सत्ता ही साधन असली पाहिजे, साध्य नव्हे. राष्ट्रहित, समाजहित आणि जनकल्याण यांना केंद्रस्थानी ठेवून राजकारण झाले पाहिजे. विचारांशी प्रामाणिक राहणारे, जनतेशी निष्ठावान असणारे आणि विकासाला प्राधान्य देणारे नेतृत्व उभे राहिले तरच लोकशाही अधिक बळकट होईल.सवंग राजकारणाच्या या अंधारातही आशेचा किरण आहे तो जागृत नागरिकांचा. जेव्हा जनता विचारांना, कार्याला आणि प्रामाणिकतेला मत देईल, तेव्हा राजकारणातील सवंगपणा आपोआप कमी होईल. कारण लोकशाहीत अंतिम शक्ती जनतेच्याच हातात असते.आज प्रश्न फक्त कोण सत्तेत आहे याचा नाही, तर सत्ता राष्ट्रासाठी वापरली जाते की स्वतःच्या स्वार्थासाठी याचा आहे.

जोपर्यंत राजकारणात राष्ट्रहिताचा सुगंध पुन्हा दरवळत नाही, तोपर्यंत सत्तेच्या खुर्चीभोवती फिरणारे हे सवंग राजकारण देशाच्या प्रगतीला बाधा आणत राहील.... मग बदलायचं नको का मला पहिल्यांदा बदला लागेल तुम्हाला बदलावा लागेल आणि सर्वांना बदलव लागेल देशप्रेम राष्ट्रहित मानवी मूल्य घेऊन भारतीय संविधान आत्मसात करून तो धर्म म्हणून विचार करणे गरजेचे आहे तरच राष्ट्रहित साधले जाईल.

**चिंतन :- भूमिपुत्र वाघ**

## हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या बैठकीत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संदीप वाकडे यांचा सत्कार



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** कळमनुरी येथील रेस्ट हाऊस येथे हिंदू सुरक्षा सेवा संघाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजूदासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड झालेल्या संदीप वाकडे सरकार यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संदीप वाकडे यांना पुष्पहार व शाल देऊन अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या माध्यमातून हिंदू समाजाच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीत संघटनात्मक बांधणी, आगामी कार्यक्रम तसेच हिंदू समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष राजूदासजी महाराज यांच्या विचारांनुसार संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रभारी राहुल मेने, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद बेद्रे, कळमनुरी तालुका अध्यक्ष अशोकराव मस्के, वसमत तालुका अध्यक्ष अर्जुन बर्डे, कळमनुरी शहराध्यक्ष अंकुश उर्फ जिद्दी पाटील, वसमत तालुका उपाध्यक्ष मंगेश पांचाळ, बाळापूर अध्यक्ष वैभव गिरे, युवा शहराध्यक्ष गोविंद भिवरकर, गजानन चव्हाण यांच्यासह हिंदू सुरक्षा सेवा संघाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचा समारोप संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या निर्धाराने करण्यात आला.

## सृजनशिल लेखक तथा कवी - अय्युब पठाण लोहगावकर



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** मराठवाड्याचे प्रसिध्द मराठी साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर ऊर्फ अ. म. पठाण यांच्या "कष्टाच्या वाटा" या संस्कारक्षम आणि आशयघन बालकथा संग्रहातील " कौतुकाची थाप " या प्रेरणादायी कथेची नवीन बदलेल्या चौथीच्या मराठी माध्यमाला असलेल्या बालभारतीच्या प्रथम भाषा मराठीच्या पाठयपुस्तकात चौथीच्या अभ्यासक्रमासाठी निवड झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या तेरा कोटी लोकांच्या घराघरात आणि मुलांच्या शाळेत अय्युब पठाण यांची प्रेरणादायी कथा " कौतुकाची थाप " ही कथा पोहोचलेली असून लेखक अय्युब पठाण यांना त्याचा सार्थ अभिमान आहे. एकंदरीत अय्युब पठाण लोहगावकर यांचा संघर्षमय प्रवास हा एका बँन्डमास्टर पासून सुरू होऊन तो शाळामास्तर पर्यंत झालेला आहे. आणि आता ते मराठी लेखक तथा कवी म्हणून गेल्या चाळीस वर्षापासून ते आजतागायत दर्जेदार व वास्तववादी लेखन करीत आहे. बालभारतीच्या अभ्यासक्रमात एका दुर्लक्षित बँन्डमास्तराची कविता इयत्ता सहावीच्या (इंग्रजी व हिन्दी माध्यम) ला जून २०१४ पासून ते एप्रील २०२६ पर्यंत सहावीच्या अभ्यासक्रमात होती. आणि आता जून २०२६ पासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार "कौतुकाची थाप" सध्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाच्या मराठी भाषेत या पाठाचा समावेश अभ्यासक्रमात केल्याने १९६७ पासून स्थापन झालेल्या बालभारतीच्या इतिहासातील प्रथमच महाराष्ट्रातील एका बँन्डमास्तराच्या साहित्य लेखनाची योग्य दखल बालभारतीने घेतल्याने याची सकारात्मक चर्चा संपूर्ण राज्यात व साहित्यक्षेत्रात मोठया प्रमाणात होऊ लागली आहे. अय्युब पठाण लोहगावकर यांची रसरशित साहित्य संपदा, सात बालकवितासंग्रह, दोन प्रौढ कविता संग्रह, तीन बालकथासंग्रह, एक ललितलेख संग्रह अशी चौदा दर्जेदार पुस्तके प्रकाशित असून त्यांना विविध सेवाभावी संस्था व संघटना यांच्याकडून १२० राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहे.यामुळे अय्युब पठाण लोहगावकर यांचा सर्वत्र अभिनंदन होत आहे.







बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ जून २०२६


## शेनोडी गावाची स्मार्ट व्हिलेज योजनेसाठी निवड



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** कळमनुरी तालुक्यातील शेनोडी गावाची केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट व्हिलेज योजनेसाठी निवड झाल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीमागे खासदार रामरावजी वडकुते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि प्रयत्नांना यश आल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. स्मार्ट व्हिलेज योजनेअंतर्गत गावात पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते तसेच विविध विकासकामांना चालना मिळणार आहे. या योजनेमुळे शेणोडी गावाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळून गाव आधुनिकतेकडे वाटचाल करणार आहे. गावाच्या निवडीबद्दल ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनांनी खासदार रामरावजी वडकुते यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे गावाच्या विकासासाठी नवे दालन खुले झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. स्मार्ट व्हिलेज योजनेच्या माध्यमातून शेनोडी गाव राज्यातील आदर्श गाव म्हणून विकसित होईल, असा विश्वास यावेळी राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांनी व्यक्त केला.






## सामाजिक बदलाच्या आशावादी व जीवनवादी कवितांचा संग्रह "सार जीवनाचे": विद्रोही कवी साहेबराव मोरे




**"सा**रं जीवनाचे" हा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला.कवी प्रा .प्रकाश बिर्हाडे यांनी आग्रहपूर्वक समीक्षणासाठी पोहच केला.साहित्यात कवितेचे उदंड पिकं आले आहे.काव्य इतर साहित्य प्रकारांच्या तुलनेत विस्तृत व मोठ्या प्रमाणावर लिहिले जातेय.प्रत्येक माणसात कवी दडलेला असतो, आपल्या आंतरीक भावनेला शब्द साज चढवून प्रतिभेच्या कोंदणात गुंफतो तो कवी म्हणून समाजापुढे, वाचकांसमोर येतो.आजच्या ईप्रिंट मिडियाच्या व डिजिटल तंत्रज्ञानाच्या मोहजाळात कविता लिहिणे,माध्यमसमूहातून लोकांपर्यंत पोहचवणे व काव्यसंग्रह प्रकाशित करणे ही अवघड बाब आहे.कवी प्रकाश हे एका नामवंत संस्थेच्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.त्यांचातला कवी जीवनप्रवासातील भावनिक निचरा निर्मळ करण्याचा प्रयत्न कविता लिहून करतो, काव्यसंग्रहातून जीवनाची समरी मांडतो."सार जीवनाचे" हा बिर्हाडेचा पहिलाच काव्यसंग्रह. साहित्याच्या निकषांवर मूल्यमापन न करता सामाजिकप्रबोधनाच्या दिशेने विश्लेषणात्मक अभ्यास करणे मला उचित वाटले. प्रस्तुत काव्यसंग्रहात ७१ कविता आहेत कवितांची विषय विविधता लक्षवेधक आहे.सर्जनशीलतेसह संवेदनशील अनुभवाच्या खाणाखुणा प्रत्येक कवितेत व्यक्त होताना दिसतात.जीवनमृत्यूमधील सिमारेषा कवेत घेण्याचे सामर्थ्य कवितेत असते याची प्रचिती सारं जीवनाचे तून येते.जीवनाचे अनाकलनीय कोडे आजवर कुणीही अचूक सोडवू शकले नाही.प्रत्येकाला नेमून दिलेल्या भूमिकेच्या चौकटीत राहून त्या भूमिकेला न्याय द्यावा लागतो. जीवन प्रवासात आलेल्या संकटांना, अनेक चांगल्या वाईट आव्हानांना पेलून प्रत्येक क्षण सकारात्मक पणे जगणे हे महत्त्वाचे. "सार जीवनाचे " चे मुखपृष्ठ हेच सुचित करते.अतिशय कल्पक तितकेच लक्षवेधक मुखपृष्ठ भावना खोब्रागडे यांच्या संकल्पनेतून साकारले आहे.कवी नात्यातील आपलेपण फुलविणारा, आपल्या रक्त- नात्यातील माणसात रमणारा,जीवनदात्यांचे उपकार जाणणारा असल्याने माय बाप विषयावर काही कविता नात्यातील संवेदना सचेतन करून जातात,"बाप माझे कल्पवृक्ष ठेवी घरावरी छायाघाम कष्टाने गाळून बहुजीर्ण झाली काया" ही कविता बापाच्या कार्याला,अस्मितेला समर्पित आहे. अनुभवांना शब्दात गुंफण्याची दृष्टी देणारा बाप कवीला कल्पवृक्ष वाटतो हा संग्रह कवीने विनयशीलपणे अर्पण केला आहे तो याच अर्थाने ."वात्सल्याची छाया " ही आईचे महात्म्य अधोरेखित करणारी गेय कविता ," अंत नाही मायेला, अशी आईची माया सदा लेकरांना देई,वात्सल्याची छाया" सहज समजणारी सोपी भाषा हे कवितेचे गुणवैशिष्ट्य. माणुसकीची महाशक्ती प्रज्ज्वलित करणारी प्रकाशची कविता मनाला भिडणारी आहे. "मानवता धर्म मोठादेऊ संदेश जगाला प्रेम वर्षाव करूनीलावू लगाम रागाला" बुद्ध शिकवणीचे सूत्रसंचालन करण्या अशा ओजस्वी शब्दांची योजना कवीतेत दिसते.राष्ट्र म्हणजे केवळ नकाशा नसून राष्ट्राच्या जडणघडणीत वीरपुरुष,महामानव,संत महंत. नदी नाले, दरीखोरी डोंगर, जमीन , वृक्षवल्ली या साधनसामग्री चा उचीत वापर करणारा सजग राजा व बहुमूल्य योगदान देणारी प्रजा असते ," महाराष्ट्र" कवितेत याचे प्रभावी चित्रण दिसते .चपखल प्रतिमा व प्रतिकांचा प्रत्ययकारी वापराने काव्य सौंदर्य खुलते हे सिद्ध करणारी ही महत्वाची कविता आहे.नाजूक कळी, लेकुरवाळी, कन्यारत्न, उंबरठा,लेक, कन्या दान, आदी मुलींची थोरवी गाणाऱ्या कविता संग्रहाची उंची वाढवितात बहुतेक कवितेत चार ओळींचे कडवे आहेत " दिव्य प्रकाशच्या पोटी जन्मी आली गोड परीलेक गोंडस पाहुनी हर्ष झाला नभापरी" नगण्य व्याकरणसदृश्य चूका मुद्रण शोधणाच्या निष्क्रियतेतून झाल्या असतील तर दखल घ्यायला हवी. "सारं जीवनाचे " ही शीर्षक स्थानी असणारी गझल विषयव्याप्ती व वैचारिक पक्वतेची पावती देणारी आहे आंबेडकरी विचारधारेवर अढळ निष्ठा, परिवर्तनाचा ध्यास घेणारी कविता पानोपानी वाचता येईल."धर्मवेडी माणसांनी डाव स्वार्थी साधला माणसाचे रक्त त्यांना सांडताना पाहिले" हा गझलेतील शेर जीवनाची तार कां तुटते? याचे उत्तर देऊन जातो काव्यसंग्रहात काही अहिराणी कविता आहेत.खानदेशी अहिराणी भाषेचा प्रसार व संवर्धनासाठी ही महत्त्वाची बाब.सर्व अहिराणी कवितेतील बोली अस्सल अहिराणी भाषेचा साज ल्यालेली असून अहिराणी बोली ची साहित्यात नोंद घेतली जाईल याची खात्री आहे.मानवी व्यवहारातील गुंता , नात्यातील अनुबंध, दैनंदिन जीवनातील भावकल्लोळ स्पष्टपणे दिसून येतो.किर्ती,जिजायी गयात पाय,जीवनना धडा, भ्रूणहत्या, ह्या उपरिनिर्देशित कविता उल्लेखनीय आहेत,"येल वंशना फुलायेदिवा रक्तना इजायेअज्ञानना अंधकार बयी निष्पापना देये"भ्रूणहत्येवर चाबुक मारणारी ही कविता सामाजिकभानासह वास्तवाचा विस्तव पेटविणारी आहे.'लेक होणं शाप नही' ही शिकवण देते. समाजाच्या वेदनेला शब्द देणारा, कवितेची ड्युटी अधोरेखित करणारा विद्रोही कवी मित्र नितीन चंदनशिवे यांची प्रस्तावना लाभली आहे. काळीजकपारीतला हुंदका वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम बिर्हाडे यांनी केले आहे असं ते नमुद करतात. कवयित्री विद्या मोरेंची पिठराखण काव्य निर्मिती ची भूमिका व हेतू विषयी उचीत भाष्य करतेप्रा प्रकाश बिर्हाडे यांच्या लेखणीत पर्यावरण, कुटुंब कबिला, महिलांच्या व्यथा, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, देशभक्ती, समाज वेदनेचा टाहो, समाजप्रबोधन प्रकर्षाने जाणवते. डिबीए प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या सारं जीवनाचे चे वाचक ,रसिकांनी स्वागत करावे असे आवाहन करतो .परिवर्तनाची लाट लेखणीतून सशक्त करण्यासाठी प्रकाश बिर्हाडे यांना पुढील साहित्य निर्मिती साठी सुयश चिंततो!!!



**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**

सारं जीवनाचे: काव्यसंग्रह

कवी : प्रा प्रकाश बिर्हाडे

प्रकाशन:,डि बी ,ऐ , चंद्रपूर

किंमत:१२०/

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ जून २०२६


## हिंगोलीच्या प्रलंबित विकासकामांबाबत जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे यांनी घेतली पालकमंत्री नरहरी झिरवळ यांची भेट



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि सर्वसामान्यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे यांनी गुरुवारी मुंबई येथे मंत्रालयात जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवळ यांची भेट घेतली. या महत्त्वपूर्ण बैठकीत हिंगोली जिल्ह्यातील रखडलेली विकासकामे, प्रलंबित प्रश्न आणि प्रशासकीय अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.प्रलंबित प्रश्नांची जंत्रीच मांडली बैठकी दरम्यान अनिल पतंगे यांनी हिंगोली जिल्ह्यातील विविध विभागांशी संबंधित आणि अनेक दिवसांपासून रखडलेल्या प्रश्नांची जंत्रीच पालकमंत्र्यांसमोर सादर केली. यामध्ये प्रामुख्याने:ग्रामीण रस्ते: ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विणणे आणि खराब रस्त्यांची दुरुस्ती करणे. जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती देऊन शेतकऱ्यांना दिलासा देणे. ग्रामीण व शहरी भागातील शासकीय आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करणे. प्रशासकीय लालफितीवर बोट "अनेकदा कामांसाठी निधी उपलब्ध असूनही केवळ प्रशासकीय लालफितीमुळे किंवा विविध विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे विकासकामे रखडतात," अशी थेट मुख्य अडचण पतंगे यांनी पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच, सामान्य जनतेला शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या अडचणी आणि हेलपाटे तातडीने थांबवण्याची मागणी त्यांनी केली. जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे यांनी मांडलेले सर्व प्रश्न पालकमंत्री नरहरी झिरवळ यांनी अत्यंत गांभीर्याने घेतले.

हिंगोलीच्या विकासात कोणतीही कसर सोडली जाणार नसल्याचे आश्वस्त करत, रखडलेल्या कामांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक बोलावून प्रशासकीय अडचणी दूर सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. पालकमंत्र्यांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे हिंगोली जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामांना आता खऱ्या अर्थाने वेग मिळण्याची चिन्हे असून, जिल्हावासीयांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांचा सत्कार



**उमरगा गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाचे नियमित प्राचार्य म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गुलाब राठोड यांची निवड झाली. एक प्रसन्न व हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणून त्यांची परिसरात ओळख आहे.शिस्तप्रिय प्राध्यापक व कुशल प्रशासक म्हणून त्यांनी नेहमीच आपली प्रतिमा जोपासली आहे. यामुळेच परिसरातील अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक त्यांच्यावर प्रेम करतात. त्यामुळेच आज तम्मा शेटगार आणि त्यांच्या मित्रमंडळाने प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांचा प्रेमपूर्वक सत्कार केला. या सत्कार वेळी प्रा .डॉ. राजारामजी निगडे, प्रा. डॉ. सुनीलजी पतंगे, प्रा. डॉ. रमेशजी पात्रे, अमोल चव्हाण, श्याम देशमुख, नागेश सूर्यवंशी, श्रेयश रेड्डी, ओमकार पाटील, अमोल चव्हाण, श्याम देशमुख, नागेश सूर्यवंशी, श्रेयश रेड्डी, प्रतीक राठोड आदी उपस्थित होते.

## ओबीसी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रा. विजय सगर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** ओबीसी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष तथा प्रा. विजय सगर यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांनी केला उत्सुर्तपणे सत्कार केला. उमरगा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष प्रा विजय सगर यांचा वाढदिवसानिमित्त युवा नेते तथा भाऊसाहेब बिराजदार अर्बन कॉपरेटिव बँकेचे संचालक माननीय रामकृष्ण बिराजदार यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष शंतनु भैय्या सगर, राष्ट्रवादी किसान सेलचे तालुकाध्यक्ष प्रताप महाराज, प्रदीपजी गावकरी, भाऊसाहेब बिराजदार बँकेचे मॅनेजर ब्रिजेश बिराजदार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते .


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103

8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद


8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २६ जून २०२६

# कणकण देशा, धनधन देशा, माझ्या भारत भ्रमणाची रंजक सफर-ओमप्रकाश शर्मा



मित्रांनो भारतातील वैवीध्यपूर्ण संस्कृती, इतिहास, आणी निसर्गाचा आनंद घेण्यासाठी भारत भ्रमण हा उत्तम मार्ग आहे, अतुलनिय भारताच्या ह्या प्रवासात आपण हिमालय ते कन्याकुमारी आणी राजस्थान च्या वाळवंटा पासून ईशान्य भारतातील हिरव्या गार दऱ्यांचा अनुभव घेता येतो, ,भारत देश भ्रमण एकूण कालावधी 12/13 वर्ष आणी खर्च एकूण स्व कमाईचा 18 लाख रु खर्च करून पूर्ण भारत भ्रमण मी पूर्ण केले...सगळा भारताचा नकाशा म्हणलं की डोळ्या समोर दिसतो खूप मोठा विशाल आपला भारत देश, ,अतुल्य भारतातील 28 राज्य व 8 केंद्र शासित प्रदेश, अनेक शहरे, अनेक धार्मिक स्थळें, व अनेक अनेक प्रकारचे किल्ले, राजवाडे, समुद्र किनारे, उंच हिमालय मधील स्थळें, पूर्व ते पश्चिम, उत्तर ते दक्षिण, भारत भ्रमण करताना भारतातील इस्कॉन मंदिर, वारणासी चा गंगा घाट, दक्षिण द्रविड शैली चे मंदिरं, दर्जिलिंग चे टी गार्डन, सिलवासा येथील ओम मंदिर, पाली येथील ओम मंदिर, आणी , इतर जे ही भारत देशात मंदिरे आहेत ते सर्व मी पाहिले व दर्शन घेऊन आलोय,, पश्चिम बंगाल इस्कॉन मंदिर, शांतीवन असो की बेंगलोर, पुणे, तिरुपती असो किंवा भारतातील प्रत्येक शहरातील विविध मंदिरे मी बघितली, , अतिशय सुंदर व सुबक भगवंताच्या मूर्ती मंदिरा मध्ये आहेत व त्या बघायला मिळतात , सर्व शीख गुरुद्वारे, चर्च, बौद्ध स्तूप, लूंबिनी नेपाळ, सारनाथ, कुशीनगर, बौद्ध गया, राजगिर, नालंदा, व जामा मस्जिद, चारमिनार असो की इतर मस्जिद असो, तसेच चर्च गोवा ची असो की पोंडेचेरी केरळ मधील असोत, मी प्रे केले तिथे जाऊन स्वतः, सर्व, किल्ले, राजवाडे, गार्डन, light and साऊंड शो असो की मरुभूमी राजस्थान असो, सर्व मी स्वतः फिरलो अनुभव आणी ज्ञान मध्ये वृद्धी केली, इतिहासाच्या पाऊलखुणा, संस्कृतीचा संगम, प्राचीन आणि आधुनिक ठिकाणी मी भेटी दिल्या, निसर्ग, निसर्गाची रचना लेक असो की ,कल्चरल प्रोग्राम, अभयारण्ये,गार्डन,झरणे धबधबे, प्राणी संग्रहालय, मी फिरताना एक रोमांचक सफर, साहसी भारत, भारताची अनवट वाट, छोटे मोठे सर्व ठिकाण,भारत दर्शन, माझे अनोखे अनुभव, सर्व काही मी कमी बजेटमध्ये केले, अत्यंत प्रेरणादायी आणि भावनिक, आपला अतुल्य भारत देश एक अद्भुत सफारी, माझी भारत यात्रा मी हिमालय पासून कन्याकुमारी पर्यंत व सेवन सिस्टर पासून ते पोरबंदर ओखा,दिव दमन पर्यंत मी स्वतः प्रवास केलेला आहे, स्वदेश दर्शन भारताच्या मातीत दडलेले सौंदर्य, भारताची भटकंती एक अविस्मरणीय अनुभव, संस्कृती व इतिहास विविधतेत एकता, भारत भ्रमणाची एक झलक माझ्या भारत यात्रेचे संस्मरण, आज ह्या लेखद्वारे मी माझ्या शब्दातून मांडत आहे, राजस्थान सारखे किल्ले पॅलेस इतर कुठे नाहीत, तर काश्मीर सारखं नैसर्गिक सौंदर्य इतर कूठे नाही, म्हणजे च प्रत्येक राज्य ची आपली एक वेगळी खासियत.. काजू म्हंटल की गोवा. अननस म्हंटल की सिल्चर चे उंच डोंगर आणि चहा म्हंटल की आसाम चे टी गार्डन.. आहे ना देवाची किमया, भारत भ्रमण, एकाच देशात अनेक देश अनुभवण्या सारखा एक अद्भुत प्रवास आहे, बर्फाच्छादित शिखरे, राजस्थान मधील वाळवंट, केरळ मधील बॅकवॉटर, आसाम मधील चहा चे मळे टी गार्डन , दक्षिण भारतातील गोपूरम , नक्षीदार विशाल मंदिरे, तसेच काश्मीर मधील नैसर्गिक सौंदर्य असे वैविध्यपूर्ण अनुभव भारताच्या यात्रेमध्ये प्रवासा मध्ये मला मिळाले, विविधता इतिहास आणि संस्कृतीचा हा उत्तम मिलाप आहे, जहाज नावं मध्ये मी प्रवास केला 500/700/1000 किमी चा.. अंदमान, लक्षद्विप चा.. अविस्मरणीय समुद्री प्रवास तो माझा, विमान प्रवास 2/3 वेळा केला केवळ.. भारत भ्रमणा मधील काही प्रमुख आकर्षण म्हणजे उत्तर भारतातील, दिल्लीतील ऐतिहासिक वास्तू, आग्रा येथील ताजमहाल, राजस्थान मधील कला,माऊंट अबू येथील नक्की झिल, दिलवाडा जैन मंदिर , रनकपूर, पावापूर, पालिताना चे जैन मंदिरे मी स्वतः जाऊन भगवान महाविर चरणी नत मस्तक होऊन दर्शन घेतले, अमृतसर चे स्वर्ण मंदिर, भारत पाकिस्तान ची सीमा वाघा आट्टारी बॉर्डर व हिमालयातील सुंदरसे निसर्ग सौंदर्य, दक्षिण भारतातील केरळ,तामिळनाडू आणि कर्नाटक राज्य हंपी,, तामिळनाडू मधील भव्य दिव्य मंदिरे , कला कुसर, संस्कृती आणि निसर्ग सौंदर्याचा अद्भुत अनुभव, पश्चिम भारतातील महाराष्ट्र गुजरात कोकण आणि राजस्थान मधील किल्ले वाळवंट आणि खाद्य संस्कृती, पूर्व ईशान्य भारतामधील अरुणाचल प्रदेश चे नैसर्गिक सौंदर्य, तवांग भारत चायना बॉर्डर, माणिपूर, मेघालय , अननस व चहाचे मळे आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेले ठिकाणे, मित्रहो भारत भ्रमण करताना तुम्हाला काही टिप्स देऊ इच्छितो, प्रवासापूर्वी योग्य नियोजन करावे, भेट देण्याची ठिकाणे जे आहेत त्याचा अभ्यास करावा, राहण्याची सोय खानपान याचा पूर्व अभ्यास करणे, दळण वळण, रेल्वे प्रवास भारत फिरण्यासाठी उत्कृष्ट आणि स्वस्त पर्याय आहे, स्थानिक संस्कृती स्थानिक लोकांच्या खाण्या पिण्याचे, संस्कृती परंपरा जाणून घेण्याचा प्रयत्न करा, भारत भ्रमणामुळे केवळ मनोरंजन च नव्हे तर इतर आपल्याला देशाच्या इतिहासाबद्दल आणि संस्कृती बद्दल खूप काही शिकायला मिळते, आपला भारत देश हा दक्षिण आशियातील एक प्रमुख देश आहे, 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वतंत्र झालेला भारत 26 जानेवारी 1950 पासून प्रजासत्ताक बनला हा जगातील सातवा सर्वात मोठा क्षेत्रफळ असलेला आणि सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे, नवी दिल्ली ही भारताची राजधानी असून 28 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचा हा एक संघ आहे, भारत आशिया खंडाच्या दक्षिणेस असून पश्चिमेस अरबी समुद्र, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि दक्षिणेस हिंद महासागर आहे, उत्तरेस हिमालय पर्वत रांगा आहेत, विविधतेत एकता हे भारताचे मुख्य वैशिष्ट्य असून येथे अनेक धर्मभाषा, संस्कृती आणि सणवार एकत्र नांदतात, आपला भारत देश की प्राचीन हिंदू संस्कृतीची भूमी असून अनेक थोर राज्य सम्राट आणि थोर पुरुषांचा इतिहास येथे घडला आहे, संस्कृती अध्यात्मिक ज्ञानाचा वारसा लाभलेला एक सामर्थ्यशाली देश म्हणून जगात आपला भारत देश ओळखला जातो, भारताचे प्राचीन आणि जुने नाव जंबुदीप व भारत वर्ष हे देखील होते, ऐतिहासिक ग्रंथानुसार राजा भरत यांच्या नावावरून या भूमीला भारत म्हटले गेले तसेच आर्य संस्कृती नुसार आर्यवर्त असे संबोधले जात असे, प्रत्येक राज्यातील प्रत्येक शहरात फिरताना त्या त्या राज्यातील विविधता तेथील मंदिरे अभयारण्य गार्डन किल्ले लेक, राजवाडे, तारांगण, म्युझियम हे सर्व पाहून मला आपल्या देशाचा फार अभिमान वाटला, पर्यटन म्हटले की काही गोष्टी व्यवस्थित प्लॅन केल्यामुळे आणि काही गोष्टी अचानक अनुभवायला मिळाल्यामुळे मनाला खूप छान वाटते, काश्मीरच्या ट्रिप मध्ये केरळच्या ट्रिप मध्ये अंदमानच्या ट्रिप मध्ये लक्षदीपच्या ट्रीप मध्ये, लेह लड्डाख आणि सेव्हन सिस्टर्स फिरताना मला खूप खूप मनाला आनंद वाटला, एखादे देऊळ बघायला जावे आणि त्या देवळाच्या पाठीमागे एखादा खळ खळ वाहणारा धबधबा , किंवा हिरवीगार टेकडी दिसावी मग तिथे रमावे असे मी खूप ठिकाणी अनुभवले, अनेक प्रकारच्या बोली भाषा बोलल्या जातात भारत देशात आपल्या... त्या त्या बोली भाषा मी भारत फिरताना बघताना ऐकल्या सर्व.. समजो, न समजो परंतु किती निर निराळ्या भाषा आहेत हे पण समझले लाईव्ह..... देवाची किमया अतिशय अद्भुत आहे खरोखरच हे 100% च समझते, एकंदर काय तर भारत भ्रमण मध्ये प्रवास म्हणजे नव्या अनुभवांची पोचडी प्रवासात सोबत घेऊन आपले नाक कान डोळ्यांनी मेंदू उत्सुक ठेवला की अनेक अनुभव घेत आपण शहाणे होऊ शकतो, प्रवास विषयक एक कोटेशन बनवून आपण जेवढे प्रवास करू तेवढे नम्र होतो कारण विविधतेने नटलेल्या मोठ्या जगात आपण किती छोटे आहोत हे आपल्याला समजते, विज्ञान भूगोल ऐतिहासिक पुस्तके वाचताना पाठ्यपुस्तकात अनेक स्थळाचा उल्लेख येतो यातील काही ठिकाणांची रंजक माहिती मी स्वतः भारत भ्रमण करताना प्रवास करताना मला अनुभवयास मिळाली, बरेच ठिकाण पाहिलेली, ती आठवल्यानंतर मनाला कायम आनंद देत राहतात, मी भारत भ्रमण करताना टप्प्याटप्प्याने अकरा ते बारा वर्षे प्रवास करून स्व कमाई ने व एकट्याने स्वतःचे 18 लाख रुपये जवळपास खर्च करून मी संपूर्ण भारत देश आपला फिरून, अनुभवाची शिदोरी आज माझ्याजवळ आहे आणि खूप काही भारत देशातील धार्मिक स्थळांची पर्यटन स्थळांची माहिती ज्ञानदेखील माझ्याकडे आहे म्हणजे मला प्राप्त झाले मित्रहो,.. भारत देशातील सर्व नद्या, आणि अरबी समुद्र हिंद महासागर बंगालची खाडी हे सर्व ठिकाणी मी फिरलो, चार धाम यात्रा असो की सर्व शक्तीपीठे सर्व धर्मातील सर्व प्रसिद्ध धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे त्या ठिकाणी मी जाऊन आलो मित्रांनो, भारत देशाबद्दल वर्णन करावे तेवढे कमी च आहे, शब्द खूप अपुरे पडतील मित्रहो लिहायचे म्हंटल्यास, पाहुणचार कौटुंबिक मूल्ये,लवचिकता, शिक्षणप्रती आदर, अध्यात्मिकता ,शैक्षणिकता आणि सर्जनशीलता हे सर्व भारतीया मधील सदगुण आहेत, भारताचे चैतन्यमय आणि वैविध्यपूर्ण समाजाच्या जडणघडणीत योगदान देतात, मला भारत देश का आवडतो कारण की भारताला एक गौरवशाली इतिहास असून प्राचीन संस्कृती लाभलेली आहे, आपले अनेक सण आहेत आणि आपण विविध संस्कृती परंपराचे पालन करतो, उत्तरेकडील हिमालय,पर्वतरांगा आपले रक्षण करतात, भारत अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, आणि हिंद महासागराने वेढलेला आहे अद्भुत सौंदर्य जंगले, गंगा यमुना सरस्वती या केवळ नद्या नसून त्याचे पाणी अमृत समान आहे, ऋषीमुनींची साधू संताची तपस्वी भूमी, अनेक ठिकाणी गुफे मध्ये साधू संत तपस्या करताना मी पाहिलेत, उत्तराखंड ही देवभूमी, आणि भूतान व नेपाळ देश हे दोन देश सुद्धा मी भारत भ्रमण सोबतच हे 2 देशही फिरलो मित्रांनो, मन खूप खूप प्रफुल्लित आणी आनंदी झाले, भारत भ्रमण करून भारत देश पाहुन आपला सर्व.... मनात निश्चय केला होता मी भारत भ्रमण करायचे ते मी पूर्ण ही केले ह्याचा मला स्वाभिमान आहे... ग्रामीण भागातून अनेक समस्या बाजूला ठेवून, साहस चिकाटी जिद्द अंगी जोपासून एकट्याने भारत भ्रमण मी केले, बघता बघता 28 राज्य व 8 केंद्र शासित प्रदेश अंदमान व लक्षद्विप व भूतान नेपाळ देशात ही 2 /3 वेळा जाऊन तेथील मंदिर, स्तूप व निसर्ग खूप जवळून पाहावयास मिळाला मला, अरुणाचल प्रदेश तवांग असो की, नाथुला पास, बुमला पास, सेला पास, झोजीला पास, असे अनेक रोमांचक रस्ते तेथून प्रवास करताना चा थरारक अनुभव अविस्मरणीय च, काश्मीर मधील निसर्ग स्वर्ग च जणू...केरल चे अतिशय सुंदर हिरवेगार वातावरण, बॅक वॉटर, थंड हवा,स्वर्ग च जणू काही धरती वर...इतके विहंगम नजारे केरळ मध्ये पाहावयास मिळतात, हत्ती जास्त केरल आणि आसाम राज्य मध्ये live बघावयास मिळतातगुजरात मधील कछ जुनागढ गिरनार परिक्रमा, इत्यादी... हिमाचल मधील देवदर्शन हिमालय पर्वत अतिशय विहंगम नजारे बघत च राहावे आणी अंगाला शहारा यावा असे काही ठिकाणे सुद्धा पाहायला मिळाले... भारत भ्रमण करताना समुद्र मधील जलचर प्राणी अनेक प्रकार च्या फिशेस, स्कुबा डायविंग करताना व स्नोरकेलिंग करताना कोरल्स असो की स्टार फिश, डॉल्फिन माश्या इत्यादी live डोळ्यांनी पाहावयास मिळाले. मी पाहिले.., पाईन, देवदार, चीड, अँपल चे झाडे विविध प्रकारचे वृक्ष, वनस्पती, पशु,पक्षी प्राणी,वनस्पती, झाडे, फुले, फळाच्या बागा, अनेक वृक्ष,जे कधीच पाहायला मिळाले नाहीत ते बघण्याचे भाग्य ही मला लाभले,, सर्व काही ईश्वराची कृपा च भारत भ्रमण करताना ईश्वर कृपे शिवाय भारत भ्रमण होणे शक्य नव्हते...शरीर सदृढ असणे तर आवश्यक आहेच परंतु ईश्वराच्या कृपेने च सर्व काही मी फिरू शकलो पाहू शकलो, कुठं पण मला अडचण आली नाही मित्रहो..... मित्रहो मी आपणास जरूर सांगेन की आपण सुद्धा पर्यटन व धार्मिक स्थळें फिरून यावे. व ज्ञान वाढते खूप प्रवासाने हे नक्कीच सांगेल मी...काही माहिती हवी असल्यास आपण मला सोशल मीडिया वर व गुगल वर शोधू शकता... भारत भ्रमण किया हुवा युवक हे नावं गुगल वर टाकावे अथवा माझे दोन मोबाईल क्रमांक देखील आपण गुगल वर सर्च डिटेल पाहू शकता. 9156438966/9975375264...

**ओमप्रकाश श्रीनिवास शर्मा..**
**बोरी. ता -जिंतूर जिल्हा परभणी.**
**महाराष्ट्र....**